DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक ०२४७२-२२७३०१ फॅक्स क्रमांक ०२४७२-२२८०१८

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५ दि. १३ मार्च २०२०.

२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५ दि. १४ मार्च २०२०.

३. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर/९२/एम-१ दि. ३०/०४/२०२०

क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी/सीआर- २६

दिनांकः- ०१/०५/२०२०.

**विषय:-** उस्मानाबाद जिल्हयातील अडकुन पडलेल्या कामगारांना/व्यक्तींना त्यांच्या मुळ गावी जाण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत

**आदेश:-**

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्र. २ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. ३ नुसार करोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्रं. ३ अन्वये शासनाने कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता लॉकडाऊनच्या कालावधीत विविध राज्यात/ जिल्हयात अडकलेले विस्थापित कामगार/पर्यटक/भाविक/विद्यार्थी व इतर व्यक्तींना उस्मानाबाद जिल्हयात येण्यासाठी व उस्मानाबाद जिल्हयात असलेल्या लोकांना त्यांच्या संबधीत राज्यामध्ये /जिल्हयामध्ये जाण्यासाठी आवश्यक असणारे परवानगी देण्यासाठी संबधीत जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणुन प्राधिकृत केले आहे.

त्याअर्थी, मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उस्मानाबाद जिल्हयातुन राज्यातंर्गत/ परराज्यात वरीलप्रमाणे नमुद व्यक्तींना त्यांच्या मुळ गावी जाण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करुन देत आहे.

**उस्मानाबाद जिल्हयातुन राज्यातंर्गत/ परराज्यात वरीलप्रमाणे नमुद व्यक्तींना त्यांच्या मुळ गावी जाण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती -**

१. ज्या कामगारांना आपल्या गावी मुळ परत जावयाचे आहे अशा कामगारांनी आपली नाव नोंदणी संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांचे कार्यालयाकडे इमेलद्वारे व दुरध्वनी संदेशाद्वारे करावी तसेच त्यांना जिल्हास्तरावर उपलब्ध करुन दिलेल्या google link - https://forms.gle/zyuRtu1yMFBqGqQq6 द्वारे नोंदणी करता येईल.

२. ज्या लोकांना हालचाल करावंयाची/त्यांचे मुळ गावी परत जाण्याची इच्छा आहे अशा कामगारांची तपासणी केली जाईल आणि कोव्हीड-१९ विषाणुंची लक्षणे नसणा-या कामगारांना/ व्यक्तींना त्यांचे मुळ गावी जाण्याची



Scanned with CamSc

परवानगी जिल्हा प्रशासनाकडुन देण्यात येईल.

३. उस्मानाबाद जिल्हयातुन इतरत्र म्हणजे त्यांच्या मुळ गावी पाठविण्यात येणाऱ्या कामगारांची वैदयकीय तपासणी करण्यात येईल आणि त्यांच्यामध्ये कोव्हीड-१९ ची कोणतीही लक्षणे नसल्यासच त्यांना मुळ गावी पाठविणेबाबतची विनंती विचारात घेतली जाईल.

४. मुळ गावी परतणाऱ्या कामगारांची संख्या व त्यांची रहिवासाची ठिकाणे विचारात घेऊन वाहतुक आराखडा तयार करण्यात येईल व संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी व राज्य प्रशासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर कामगारांना त्यांच्या मुळ गावाकडे रवाना करण्यात येईल.

५. सर्व स्थलांतरीत कामगार, विदयार्थी व पर्यटक यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी कोणतीही घाई गडबड न करता त्यांचे मुळ गावी जाण्याच्या अनुषंगाने संबंधित तालुक्याच्या नियंत्रण कक्षाशी दुरध्वनीवरुन अथवा इमेलद्वारे आपली नाव नोंदणी करावी.

**तालुका नियंत्रण कक्ष , संपर्क क्रमांक व ई-मेल आयडीची यादी खालीलप्रमाणे-**

१. तहसील कार्यालय उस्मानाबाद-०२४७२-२२७८८२-tahosmanabad@gmail.com
२. तहसील कार्यालय तुळजापुर-०२४७१-२४२०२७-tahtuljapur@gmail.com
३. तहसील कार्यालय उमरगा- ०२४७५-२५२०३७-tahomerga@gmail.com
४. तहसील कार्यालय लोहारा- ०२४७५-२६६५०७-loharatah@gmail.com
५. तहसील कार्यालय भुम- ०२४७८-२७२०२४-tahsildarbhoom@.com
६. तहसील कार्यालय परंडा -०२४७७-२३२०२४-tahparanda@gmail.com
७. तहसील कार्यालय कळंब-०२४७३-२६२२५४-tahkalamb@gmail.com
८. तहसील कार्यालय वाशी-०२४७८-२७६२५०-tahwashi@gmail.com

तरी संबधीत तालुक्याच्या नियंत्रण कक्षाशी दुरध्वनीरुन अथवा इमेलद्वारे संपर्क साधावा व आपली नाव नोंदणी करावी.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

**प्रत:- मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

**१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.**
**२. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.**
**३. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.**
**४. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.**
**५. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.**

१/५/२०
(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद
DISTRICT MAGISTRATE

Scanned with CamScanner